# 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पर्वाचे आयोजन

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) – क्विक हील फाऊंडेशन या जागतिक सायबर सुरक्षा सोल्युशन्स प्रदाता क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या सीएसआर शाखेने पुण्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पर्वाचे आयोजन केले.

फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचे कुलगुरू व्ही. एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवार, महाराष्ट्र सायबरचे पोलीस अधीक्षक संजय शिंत्रे यांच्यासह विविध संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ या कार्यक्रमाला उपस्थित होते.